सकाळ

# सायबर सुरक्षा पुरस्काराचे वितरण

पुणे, ता. १० : 'क्विक हिल फाउंडेशन'च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे कुलगुरू व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबरचे पोलिस अधीक्षक संजय शिंत्रे आणि क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आदी शिक्षणतज्ज्ञ या वेळी उपस्थित होते. सायबर सुरक्षा वॉरिअर्स (विद्यार्थी), सायबर सेफ्टी चॅम्पियन्स (शिक्षक) आणि सायबर शिक्षा चॅम्पियन ऑफ द इअर (संस्था) या तीन श्रेणींमध्ये पुरस्कार दिले. सायबर सुरक्षेसाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये सायबर सुरक्षिततेचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त फाउंडेशनने 'कमवा आणि शिका', 'प्राध्यापक विकास कार्यक्रम' अशा उपक्रमांच्या माध्यमातून कौशल्यामधील पोकळी दूर करत तरुणांना सक्षम करण्यासाठी काम करण्यात येत आहे.

Pune, Pune-Today
11/02/2024 Page No. 102